मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# कर वसुलीसाठी युजर फ्रेंडली प्रणाली विकसित

## महानगरपालिकेचा कर वसुली पद्धती सुलभ करण्याचा प्रयत्न: ड्रोनद्वारे सर्वेक्षण सुरु असून उत्पन्न निश्चितपणे वाढणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांचा उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत म्हणून मालमत्ता कराकडे पाहिले जाते, या कर वसुलीसाठी युजर फ्रेंडली प्रणाली विकसित करून त्यावर अधिक भर देत महानगरपालिकेने कर वसुली पद्धती सुलभ करण्याचा प्रयत्न केला आहे. शहरातील सर्व मिळकती कराच्या कक्षेत आणण्यासाठी ड्रोन सर्वेक्षण द्वारे मिळकतींचे सर्वेक्षण सुरु असून, त्याद्वारे महापालिकेचे उत्पन्न निश्चितपणे वाढणार आहे, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.

कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत शहरातील इमारत व जमिनीवर मालमत्ता कर आकारणी व वसुली करण्यात येत आहे. जिओ सिक्वेन्सिंग करून मनपा क्षेत्रातील सर्व मालमत्तांना प्रत्यक्ष स्थळावर जावून नवीन मालमत्ता क्रमांक देण्यात येत आहे. करसंकलन विभागामार्फत नागरिकांना जलद आणि सोप्या पध्दतीने सेवा मिळाव्यात, यासाठी नव्याने ऑनलाईन पध्दतीने सेवा सुविधा देण्यात येत आहेत.



### मालमत्तांसाठी युपीक आयडी

» युपीक आयडी चा वापर करून नागरिक एकाच आयडी च्या माध्यमातून महापालिकेच्या विविध विभागातील कामे करू शकणार आहेत. युपीक आयडी मुळे नागरिकांची डिजिटल गोपनीयता जपली जाणार आहे. युपीक आयडी मध्ये झोन क्रमांक, गट क्रमांक, ब्लॉक क्रमांक, इमारत क्रमांक आणि मालमत्ता क्रमांक नमूद करण्यात आला आहे. यामुळे महापालिका व शासनाच्या इतर विभागांमध्ये समन्वय साधण्यास मदत होणार आहे.

### जिओ सिक्वेन्सिंगमुळे येणार सुसूत्रता

» महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमत्तेच्या ठिकाणी प्रत्यक्ष स्थळावर जावून नवीन मालमत्ता क्रमांक देण्यात येत आहेत. यामुळे मालमत्ता कर आकारणी न झालेल्या नवीन, वाढीव किंवा वापर बदल मालमत्ता कर आकारणी कक्षेत येवून महापालिकेच्या उत्पन्न वाढीस मदत होणार आहे. मालमत्तांना सलग क्रमांक देण्यासाठी संपुर्ण मालमत्तांची सलग नोंदणी केल्यामुळे यापुढे कोणतीही मालमत्ता शोधण्यास अडचण निर्माण होणार नाही. तसेच भविष्यातील बीलवाटप, वसुली, जप्ती नोटीस वाटप आदी आवश्यक कामांत अधिक सुसूत्रता येणार असून कामे जलद गतीने पुर्ण करता येतील.

### डिजीटल लॉकर होणार उपलब्ध

» मालमत्तेच्या प्रत्यक्ष स्थळावर जाऊन मोजणी करून नकाशा तयार करून मालमत्तेची सर्व माहिती अद्ययावत करण्यात येत आहे. नागरिकांना मालमत्तेची माहिती, मालमत्ता कर दाखला आदींबाबतची माहिती नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर उपलब्ध होणार आहे. यासाठी नागरिकांसाठी डिजीटल लॉकरची सुविधा उपलब्ध करून देण्याचे महापालिकेचे उद्दिष्ट आहे.

# पिंपरी चिंचवड महापालिका राबविणार "अंदाजपत्रकात नागरी सहभाग" उपक्रम

## शहरातील विविध उपाययोजना, प्रकल्प, उपक्रम यांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी पहिल्यांदाच ऑनलाईन पद्धतीने अभिप्राय मागविण्याचे ठरविले आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने २०२४ या आर्थिक वर्षापासून अंदाजपत्रकात नागरी सहभाग या उपक्रमाच्या माध्यमातून शहरातील विविध उपाययोजना, प्रकल्प, उपक्रम यांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी पहिल्यांदाच ऑनलाईन पद्धतीने अभिप्राय मागविण्याचे ठरविले आहे. हा उपक्रम पिंपरी चिंचवड शहरातील रहिवाशांना त्यांच्या परिसरातील विविध विकास प्रकल्पांना सार्वजनिक निधी वाटप करण्याच्या निर्णय प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देईल.

'अंदाजपत्रकात नागरी सहभाग' ही वार्षिक शहरव्यापी मोहीम २००७ पासून ऑफलाईन पद्धतीने सुरू झाली होती. ऑफलाईन पद्धतीमध्ये अर्ज जमा करण्यासाठी नागरिकांनी संबंधित विभागीय कार्यालयांना भेट देणे आवश्यक होते. ही गैरसोय टाळण्यासाठी या वर्षापासून नागरिकांचे अभिप्राय स्मार्ट सारथी ॲप आणि महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या क्युआर कोडद्वारे संकलित केले जाणार आहेत. यामुळे नागरिकांना सहज अभिप्राय देणे शक्य तर होईलच आणि महापालिकेस रस्ते, सांडपाणी, आरोग्य, उद्याने आणि क्रीडांगणे आणि इतर सार्वजनिक सुविधांमध्ये सुधार करण्यासाठी किंवा नव्याने मागणी करण्यासाठी मदत होणार आहे.




### अंदाजपत्रकात विचार केला जाईल

» चालू आर्थिक वर्षातील नागरिकांच्या सूचनांचा पुढील आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकात विचार केला जाईल. उदाहरणार्थ, आर्थिक वर्ष २०२५-२६ साठीचे अभिप्राय २०२४-२५ मध्ये एकत्रित केले जातील. तसेच प्रत्येक क्षेत्रीय कार्यालय मागील आर्थिक वर्षात जमा झालेल्या मालमत्ता कराच्या १०% भाग हा अंदाजपत्रकातील नागरी सहभाग उपक्रमाअंतर्गत आलेल्या निवडक सूचनांसाठी खर्च करेल. नागरिकांच्या सूचना, प्रकल्प अंमलबजावणी आणि अंदाजपत्रकीय वाटपावर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार अंदाजपत्रक समितीकडे असणार आहे.

### ऑनलाईन पद्धतीने अभिप्राय नोंदविण्याची प्रक्रिया

» महापालिका अधिकृत संकेतस्थळ आणि स्मार्ट सारथी ॲपमधील क्यूआर कोडद्वारे नागरिक त्यांच्या सूचना नोंदवू शकतात.

» सूचनांमध्ये प्राधान्याने रस्ते, पाणीपुरवठा आणि पथदिवे यांसारख्या विविध सोयींमधील सुधारणांबाबतच्या सूचनांचा समावेश असेल.

» क्षेत्रीय कार्यालये नागरिकांच्या माहितीचे मूल्यांकन करतील. तसेच विभाग प्रमुखांशी चर्चा करून मालमत्ता कर संकलनावर आधारित अंदाजपत्रकाचे वाटप करतील. यानंतर निष्कर्ष आणि अंदाजपत्रकीय प्रस्ताव मान्यतेसाठी समितीसमोर सादर करतील.

» नागरिकांच्या सूचना आणि क्षेत्रीय कार्यालयनिहाय अर्थसंकल्प वाटपाचे निकाल महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरील वार्षिक अंदाजपत्रक या पर्यायावर क्लिक करून नागरिक पाहू शकतील. तसेच अंदाजपत्रक समिती दर सहा महिन्याला विकासकामांच्या प्रगतीचा आढावा घेईल.

# पूजा खेडकर प्रकरणामध्ये अपंगाच्या दाखल्याबाबत माहिती आली समोर

## पूजा खेडकर यांचा अपंगत्वाचा दाखला खरा असल्याचा दावा, जिल्हा शल्य चिकित्सकाडून होणार तपासणी

**पुणे | प्रतिनिधी**

मागच्या महिन्याभरापासून मोठ्या प्रमाणात चर्चेत असलेल्या वादग्रस्त IAS अधिकारी पूजा खेडकर यांच्यावर UPSC कडून नुकतीच मोठी कारवाई करण्यात आली. UPSC कडून पूजा खेडकर यांची उमेदवारी रद्द करण्यात आली तसेच यापुढे यूपीएससीकडून घेण्यात येणाऱ्या कोणत्याही परीक्षेमध्ये पूजा खेडकर यांना बसता येणार नाही, असंही यूपीएससीकडून स्पष्ट करण्यात आलं. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयील गैरवर्तन व त्यानंतर कागदपत्रांमध्ये आढळलेली कथित अनियमितता या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आली होती. मात्र या प्रकरणात एक मोठा ट्विस्ट आला आहे. पूजा खेडकर यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वायसीएम रुग्णालयातून मिळवलेला अपंगत्वाचा दाखला खरा असल्याचा दावा करण्यात आला आहे.

पूजा खेडकर प्रकरणात यूपीएससीचे असणारा एकमेव लूपव्होलचा फायदा पूजा खेडकर हिने घेतला. गेल्या पंधरा वर्षांमध्ये यूपीएससीची फसवणूक करणारी ती एकमेव उमेदवार निघाली. त्यामुळे लोकसेवा आयोगाने आपला एसओपी अधिक मजबूत करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे भविष्यात कोणी यूपीएससीची या पद्धतीने फसवणूक करु शकणार नाही.

पूजा खेडकर प्रकरण उजेडात आल्यानंतर सन २००९ ते २०२३ या काळातील आयएएस परीक्षा उत्तीर्ण झालेल्या १५ हजार उमेदवारांच्या डाटा तपासण्यात आला. सर्वांच्या कागदपत्रांची बारकाईने तपासणी केली गेली. परंतु अन्य कोणीही नागरी सेवा परीक्षा नियमांचा भंग केला नाही. पूजा खेडकर हिने बनावट माहितीच्या आधारे काही वेळी यूपीएससीची परीक्षा दिली. त्यामुळे यूपीएससी आपली एसओपी अधिक मजबूत करणार आहे.

यूपीएससीमध्ये 9 संधी असताना 12 संधी घेणाऱ्या पूजा खेडकर हिने 'लखोबा लोखंडे'सारखा प्रकार केला. अधिक संधी देण्यासाठी नावे बदलली. 9 वेळा पूजा दिलीपराव खेळकर तर तीन वेळा पूजा मनोरमा दिलीप खेडकर हे नाव वापरले.




### पूजाने वडिलांचे नावसुद्धा बदलले

» पूजा खेडकर हिने स्वतःचे नाव नाही तर वडिलांचे नावसुद्धा बदलले. पूजा वडिलांच्या नावात सात वेळा खेडकर दिलीपराव कोंडिबा, दोन वेळा खेडकर दिलीप के तर एक वेळा दिलीप खेडकर आणि एक वेळा दिलीप के खेडकर असे बदल केले. हे सर्व प्रकार उघड झाल्यानंतर पूजा खेडकर हिची उमेदवारी केंद्रीय लोकसेवा आयोगाने (यूपीएससी) रद्द केली आहे. तिला भविष्यात यूपीएससी परीक्षा देत येणार नाही. तिच्या निवडीवर कायमस्वरुपी बंदी घातली आहे.

### अपंगत्वाचा दाखला खरा असल्याचा दावा

» वादग्रस्त बडतर्फ आयएस अधिकारी पूजा खेडकर यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वायसीएम रुग्णालयातून मिळवलेला अपंगत्वाचा दाखला खरा असून , सर्व तांत्रिक बाबी पडताळून आणि नियमानुसारच तो दिला गेला आहे. दाखल्या संदर्भात करण्यात आलेल्या चौकशीमध्ये वायसीएम सर्व कर्मचारी निर्दोष असल्याचा खुलासा करत रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉक्टर राजेंद्र वाबळे यांनी चौकशी अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयकडे पाठवला आहे. पूजा खेडकर यांच्या डाव्या पायाच्या गुडघ्यात 7 टक्के अपंगत्व असल्याचा दाखला त्यांना देण्यात आला होता, मात्र वायसीएमकडून देण्यात आलेल्या दाखल्याचा कोणत्याही शासकीय किंवा खासगी संस्थेच्या नोकरीसाठी उपयोग होऊ शकत नाही ,असे स्पष्ट करण्यात आले आहे.

### जिल्हा शल्य चिकित्सकाडून होणार तपासणी

» डॉक्टर वाबळे यांनी पूजा खेडकर यांना अपंगत्व दाखला देण्याआधी कोणकोणत्या शारीरिक तपासण्या करण्यात आल्या होत्या आणि त्या योग्य तज्ज्ञाकडून केल्या गेल्या होत्या का? या संदर्भात दिलेल्या माहितीची पुन्हा एकदा जिल्हा शल्य चिकित्सकाडून तपासणी केली जाणार असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे.

# शहरात 55 लाखांपेक्षा जास्त वृक्षांची नोंद, उद्यान विभागामार्फत वृक्षगणना

## मुंबई उच्च न्यायालयाने वृक्षगणनेसंदर्भात आदेश दिले, त्यानुसार महापालिकेच्या उद्यान विभागामार्फत ही वृक्षगणना करण्यात आली

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात तब्बल ५५ लाखांपेक्षा जास्त वृक्षांची नोंद करण्यात आली असून, शहरातील १५ वॉर्ड मध्ये ही वृक्षगणना करण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाने वृक्षगणनेसंदर्भात आदेश दिले असून, त्यानुसार महापालिकेच्या उद्यान विभागामार्फत ही वृक्षगणना करण्यात आली.

जिओग्राफीक इन्फर्मेशन सिस्टिम (जीआयएस) आणि ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीम (जीपीएस) चा वापर करून प्रत्येक वृक्षाची माहिती, भौगोलिक स्थान, अक्षांश आणि रेखांश, प्रजाती, स्थानिक आणि शास्त्रीय नाव, व्यास, उंची, सद्यस्थितीबाबत सर्वेक्षण करण्यात आले. त्यानुसार शहरात ५५ लाख ८१ हजार ५७८ एवढी वृक्षसंख्या नोंदविण्यात आली.

१५ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत ही नोंद करण्यात आली असून, शहरात वृक्षांच्या एकूण ४३० प्रजाती आढळल्या आहेत. त्यात ७५ फमिलीज दिसतात. यात सर्वाधिक संख्या गिरीपुष्प या वृक्षांची आहे.

याशिवाय दुर्मिळ वृक्षांची संख्या १२४ नोंदवण्या त आली असून, त्यात जुन्या वृक्षांची (हेरिटेज ट्री) संख्या २८३८ आहे. हे हेरिटेज ट्री सार्वजनिक ठिकाणी आहेत. साहजिकच वड हा सर्वात मोठे खोड असलेला वृक्ष म्हणून नोंदवला गेला आहे.

शहरात हिरवळीचा भाग सहकारनगर, धनकवडी असून, सर्वाधिक कमी वृक्षसंख्या भवानीपेठ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत आहे. भवानीपेठ हा भाग जुन्या पुण्याचा भाग असल्यामुळे तेथे वाडे- वस्त्यांचा भाग आहे.

त्यामुळे तेथे वृक्षसंख्या कमी दिसते. याशिवाय हडपसर, कोथरूड, नगररस्ता, शिवाजीनगर, औंध बाणेर या भागातील वृक्षसंख्या चार लाखांच्या पुढे आहे. १९९५-९६ मध्ये वृक्षसंख्या २८ लाख होती. २००७-८ मध्ये ती ३६ लाख झाली आणि आताच्या गणनेनुसा ५५ लाखांच्या पुढे गेली आहे.



### अद्यापही गणना सुरूच

» न्यायालयाने दर पाच वर्षांनी वृक्षगणना करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, प्रत्यक्षात ही गणना करण्यासाठी सात ते आठ वर्षे लागतात. सध्या ५५ लाखांपेक्षा जास्त गणना झाली असली, तरी अद्याप काही ठिकाणची नोंद होणे बाकी आहे. त्यामुळे या संख्येत किमान अडीच लाख वृक्षांची आणखी भर पडू शकते, अशी माहिती उद्यान विभागातील अधिकाऱ्यांनी दिली. त्यामुळे किमान दहा वर्षांनी गणना व्हावी, असे मत यानिमित्ताने पुढे आले आहे.

### गिरीपुष्प पाश्चात्य वनस्पती

» गिरीपुष्प ही भारतीय प्रजाती नसून, ती पाश्चात्य प्रजाती आहे. या वृक्षांमुळे पर्यावरणाची हानी होते. त्यामुळे हे वृक्ष समूळ नष्ट झाले पाहिजेत, यासाठी पर्यावरणवादी अनेक संघटनांनी, व्यक्तींनी प्रयत्न सुरू केले आहेत. त्याऐवजी देशी झाडे लावावीत, अशी जागृती केली जात आहे. २५ वर्षांपूर्वी वृक्ष संख्या कमी असल्याने वेगाने वाढणाऱ्या वृक्षांची लागवड करण्यात आली. अनेक बांधकाम व्यावसायिकांनीही हेच वृक्ष लावले.

# संभाव्य अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर महापालिकेची यंत्रणा सज्ज

## संबंधित विभागांमार्फत तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याची कार्यवाही सुरु : आयुक्त शेखर सिंह यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

संभाव्य अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी महापालिकेची सर्व आपत्कालीन यंत्रणा दक्ष असून धोकादायक ठिकाणांची पाहणी करून त्या अनुषंगाने संबंधित विभागांमार्फत तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याची कार्यवाही सुरु आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली. तसेच अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी देखील सतर्क राहावे, असे आवाहन देखील आयुक्त सिंह यांनी केले आहे.



पिंपरी चिंचवड शहरातून वाहणाऱ्या नद्यांवर असलेल्या धरणांच्या पाणी साठ्यात वाढ झाली असून ते पूर्ण भरण्याच्या स्थितीत आहेत. तसेच येत्या काही दिवसांत पुणे जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. अशावेळी धरणातून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग होऊ शकतो. त्यामुळे पूर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. संभाव्य अतिवृष्टीच्या अनुषंगाने पूरबाधित नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यासाठी महापालिकेच्या वतीने योग्य नियोजन करण्यात येत आहे. स्थलांतरित ठिकाणी आवश्यक सुविधा, भोजन तसेच वैद्यकीय सेवा आदी बाबींचे नियोजन आणि व्यवस्थापन देखील करण्यात येत आहे. तसेच पूर परिस्थिती उद्भवल्यास ती हाताळण्यासाठी संभाव्य धोक्याच्या ठिकाणांची पाहणी करून त्यावर संबंधित विभागामार्फत तातडीने उपाययोजना करण्याची कार्यवाही सुरु असल्याची माहिती महापालिका अतिरिक्त आयुक्त चंद्रकात इंदलकर यांनी दिली.

### अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांसाठी सूचना

- » अतिवृष्टीच्या अनुषंगाने नदीच्या पाणी पातळीत वाढ होण्याची शक्यता असते. त्यामुळे नदीकाठी राहणाऱ्या नागरिकांनी सतर्क राहावे.
- » कोणीही नदीपात्रात उतरू नये.
- » वीजेचे खांब, डी. पी. बॉक्स, ट्रान्सफॉर्मर अशा विद्युत उपकरणांजवळ जाऊ नये.
- » नदीपात्राजवळ किंवा धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये अथवा फोटोग्राफी करू नये.
- » आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित व्हावे.
- » पूरबाधितांसाठी महापालिकेच्या वतीने निवारा केंद्रांची सोय केली आहे.
- » गरज असेल तरच घराबाहेर पडावे.
- » अफवांवर विश्वास न ठेवता महापालिका व पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे.
- » नागरिकांनी आपली व आपल्या परिवाराची काळजी घ्यावी.
- » कोणतीही आपत्ती उद्भवल्यास महापालिकेच्या नियंत्रण कक्षास संपर्क साधावा.

“ अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर शहरातील नागरिकांनी विशेषतः नदीकाठच्या रहिवाश्यांनी सतर्क राहावे. कोणतीही आपत्ती उद्भवल्यास महापालिकेच्या अग्निशमन मुख्य नियंत्रण कक्षाच्या ९९२२५०१४७५ किंवा ०२०- २७४२३३३३ तसेच मध्यवर्ती नियंत्रण कक्षाच्या ०२०- ६७३३११११ या क्रमांकावर संपर्क साधावा, तसेच नागरिकांनी महापालिका व पोलीस प्रशासनाच्या वतीने वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करून प्रशासकीय यंत्रणेला सहकार्य करावे.

**- ओमप्रकाश बहिवाल, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी.**

“ पावसाच्या पाण्यामुळे काही चेंबर्स तुंबले असून त्या अनुषंगाने या ठिकाणी संबंधित अधिकारी कर्मचारी प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक कार्यवाही सुरु आहे. पाणी उपसा यंत्रणेद्वारे पाणी साचलेल्या भागातील पाणी उपसण्यासाठी यंत्रणा कार्यरत आहे. अतिवृष्टीच्या अनुषंगाने रस्त्यावर पाण्याचा निचरा होण्यासाठी आवश्यक उपाययोजना सुरु आहेत.

**- रामदास तांबे, मुख्य अभियंता, जलनिस्सारण विभाग.**

“ सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने पिण्याच्या पाण्यातून जलजन्य रोगांचा प्रसार होण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास बाधा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागरिकांना स्वच्छ व शुध्द पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड महापालिकेमार्फत आवश्यक खबरदारी घेण्यात येत आहे. तरी दक्षतेची खबरदारी म्हणून नागरिकांनी पिण्याचे पाणी गाळून आणि उकळून प्यावे.

**- श्रीकांत सवणे, मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभाग.**

“ पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या वैद्यकिय विभागामार्फत १६ पथके तयार केलेली असून या पथकांमार्फत नागरिकांची आरोग्य तपासणी करुन औषधोपचार करण्यात येत आहेत. जलजन्य व किटकजन्य आजारांबाबत घरोघरी जाऊन सर्वेक्षण, जनजागृती करण्यात येत असून आजारी नागरिकांना औषधोपचार पुरविण्यात येत आहेत. पिण्याच्या पाण्यातून जलजन्य आजार होण्याची दाट शक्यता असते त्यामुळे खबरदारी म्हणून नागरिकांनी पिण्याचे पाणी गाळून व उकळून प्यावे. तसेच जलजन्य आजारांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी प्रत्येक नागरिकांनी आठवड्यातील एक दिवस एक तास आपल्या घराच्या आतील व बाहेरील पूर्ण परिसराचे परिक्षण करावे पाणी साचणारी सर्व ठिकाणे (डासोत्पत्ती स्थाने) नष्ट करावी.

**- डॉ.लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी.**

# महापालिका सेवेतून 30 अधिकारी, कर्मचारी सेवानिवृत्त

## अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी सेवानिवृत्तांना उत्तम आरोग्य व आनंदी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

सेवानिवृत्त अधिकारी आणि कर्मचारी यांनी जबाबदारीने, प्रामाणिकपणे सेवा करून आपल्या उत्कृष्ठ कामकाजाचा परिचय दिला आहे. असे सांगून अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी सेवानिवृत्तांना उत्तम आरोग्य व आनंदी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने माहे जुलै २०२४ अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या २८ आणि स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या २ अशा एकूण ३० कर्मचा-यांचा अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांच्या हस्ते दिवंगत मधुकरराव पवळे सभागृह येथे सत्कार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी आनंद गायकवाड, उपआयुक्त संदीप खोत, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, लेखाधिकारी चारुशीला जोशी, कर्मचारी महासंघाचे अभिमान भोसले, नथा मातेरे, बालाजी अय्यंगार, रमेश लोंढे, तसेच कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचा-यांचे नातेवाईक उपस्थित होते.

माहे जुलै २०२४ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या अधिकारी आणि कर्मचा-यांमध्ये मुख्य अभियंता रामदास तांबे, कार्यकारी अभियंता विलास देसले, लेखाधिकारी राजू जठार, उप आभियंता सुभाष काळे, कार्यालय अधिक्षक अनिता मालपाठक, निळकंठ काची, मुख्याध्यापिका संगीता टिळेकर, भारती थिटे, सुनिता राऊत, भारती विभांडिक, लिलावती कांबळे, लेखापाल ज्ञानेश्वर सोमवंशी, मुख्य लिपिक राजू काळभोर, सिस्टर इनचार्ज प्रमिला बडीगेर, फार्मासिस्ट शाम चव्हाण, कनिष्ठ अभियंता सुधाकर चव्हाण, कॉम्प्युटर ऑपरेटर रेवती अडूरकर, वायरमन निसार शेख, दशरथ राणे, वायरलेस ऑपरेटर संजय कांबळे, मजूर दिपक जवळकर, विनोद ताडीलकर, सुरेश हगवणे, नंदकुमार कलाटे, अशोक कदम, बबन जिते, आया अलका भेगडे, सफाई सेवक उत्तम माने यांचा समावेश आहे तर कार्यकारी अभियंता अनिल राऊत, उप शिक्षिका मंजिरी डेंगळे यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

# पुरावेळी एकही 'आपदा मित्र' दिसला नाही

## दहा हजारांच्या किटचेही वाटप, पालिकेकडे स्वतंत्र आपत्ती व्यवस्थापन टीमचा अभाव

**पुणे | प्रतिनिधी**

नैसर्गिक आपत्तीवेळी मदत कार्याचे व्यवस्थापन करता यावे, संकटातील नागरिकांना मदत करता यावी यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने तब्बल पाचशे स्वयंसेवकांना अर्थात 'आपदा मित्रांना' बारा दिवसांचे प्रशिक्षण दिले होते. मात्र, सिंहगड रोडवरील पुरावेळी एकही 'आपदा मित्र' दिसला नसल्याचे समोर आले आहे.



राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणच्या ( एनडीएमए) आपत्ती मदत प्रकल्पात देशातील सात शहरांचा मुंबई, चेन्नई, कोलकत्ता, अहमदाबाद, बंगलूरु, हैद्राबाद आणि पुणे या सात शहरांचा समावेश आहे. अर्बन फ्लड रिस्क मॅनेजमेंट ( युएफआरएम) प्रकल्पांतर्गत पुण्यासाठी भरीव निधीची तरतूद केली जाते. प्रशिक्षणानंतर आपदा मित्राला तब्बल दहा हजारांचे किट दिले होते. या किटमध्ये लाईफ जॅकेट, प्रथमोपचार, रेस्क्यू उपकरणे आदींचा समावेश होता. पुरावेळी पालिका स्तरावर आपत्ती व्यवस्थापन पथकाचा अभाव असल्याचेही दिसून आले.

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (एनडीएमए) प्रकल्पांत पुणे शहराचा समावेश आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाने काही महिन्यापूर्वी तब्बल पाचशे आपदा मित्रांना बारा दिवसांचे प्रशिक्षण दिले. यामध्ये शोध व बचाव, प्रथमोपचार , रेस्क्यू करणे यासह पुरात वाहून जाणाऱ्यांना, बुडणाऱ्यांना वाचविण्याचे कौशल्य शिकवले गेले. यात पुणे शहरातील पन्नास आपदा मित्रांचा प्रशिक्षणात सहभाग होता. प्रत्येक आपदा मित्राला दहा हजार रूपयांचे किटसुद्धा दिले गेले. मात्र, गेल्या आठवड्यात सिंहगड रोड

> पुणे महापालिकेतील पन्नासजणांना 'आपदा मित्र ' म्हणून जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून प्रशिक्षण दिले गेले आहे. त्यांच्यासह पुणे महापालिकेचे आपत्ती व्यवस्थापन पथक सक्रिय कार्यरत आहे.
>
> **- गणेश सोनुने, आपत्ती व्यवस्थापन प्रमुख, पुणे महापालिका.**

परिसरात उद्भवलेल्या पूरस्थितीत एकही आपदा मित्र दिसला नाहीत. त्यामुळे कोट्यावधी रूपये प्रशिक्षण घेऊन कागदी घोडे नाचविण्याचा हा प्रकार पुन्हा एकदा समोर दिसून आला आहे.

अर्बन फ्लड रिस्क मॅनेजमेंट (युएमआरएम) प्रकल्पात पुणे शहरासाठी पंधराव्या वित्त आयोगांतर्गत गेली पाच वर्ष प्रत्येक वर्षाला पन्नास कोटी रूपयांचा निधी मिळत आहे. या निधीमधून महापालिकेने अल्प, दीर्घ मुदतीच्या स्ट्रक्चरल, नॉन स्ट्रक्चरल उपायोजना करणे अपेक्षित होते. यासह राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन, राज्य आपत्ती व्यवस्थापनाच्या धर्तीवर महापालिकेच्या स्तरावर पुणे शहर आपत्ती व्यवस्थापन असणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ, ड्रेसकोड, रेस्क्यू उपकरणे, बोट असणे आवश्यक आहे. महापालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये आपत्ती व्यवस्थापन केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. या केंद्रात सेवकांची चौवीस तास नेमणूक करण्यात आलेली आहे. आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत पुणे महापालिकेतील विविध विभाग, खात्यातील सेवक, कर्मचारी यांच्यासाठी जनजागृती, प्रशिक्षण, क्षमता व बांधणी आराखडा तयार करण्याचे नियोजन झाले नाही.

# कात्रज-कोंढवा रस्त्याला मिळाला निधीचा बूस्टर!

## स्थायी समितीने दिली 71 कोटींच्या निधीला मान्यता : 94 हजार चौरस मीटर क्षेत्राचे भूसंपादन होणार

**पुणे | प्रतिनिधी**

रखडलेल्या कात्रज-कोंढवा रस्त्याच्या रुंदीकरणाला वेग प्राप्त व्हावा यासाठी भूसंपादनाकरता राज्य सरकारकडून निधी प्राप्त झाला आहे. तसेच महापालिकेनेही निधी मंजूर केला आहे. त्यामुळे या रस्त्यासाठी भूसंपादन केले जाणार असून ७१ कोटींच्या निधीला स्थायी समितीने मान्यता दिली आहे. त्यामुळे ९४ हजार चौरस मीटर क्षेत्राचे भूसंपादन केले जाणार आहे.



कात्रज-कोंढवा ८४ मीटरच्या डीपी रस्त्याच्या कामाला ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी मान्यता देण्यात आली आहे. हे काम २०२१ मध्ये पूर्ण होणे आवश्यक होते. गेल्या चार वर्षांपासून या रस्त्याचे काम रखडले आहे. काम अर्धवट असल्याने रस्त्यावर अपघातांची मालिका सुरु आहे. त्यामुळे रस्त्याचे काम मार्गी लावण्यात यावे, अशी मागणी नागरिक करत आहेत. रस्त्याच्या कामासाठी ३७५ कोटींची गरज आहे. या रस्त्यासाठी पालिकेच्या बजेटमध्ये ७४ कोटी, तर राज्य सरकारकडून १३९ कोटींचा निधी आला आहे. त्यामुळे या रस्त्याच्या भूसंपादनासाठी २१३ कोटींचा निधी उपलब्ध आहे. या भूसंपादनासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे ३० टक्के रक्कम भरण्यासाठी ७१ कोटींचा निधी देण्यास स्थायी समितीने मान्यता दिली आहे.

दक्षिण पुण्यातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी कात्रज-कोंढवा रस्ता महत्त्वाचा आहे. या रस्त्यावरून अवजड वाहतूक मोठ्या प्रमाणात होते. या रस्त्यावरील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी रुंदीकरण करण्यात येणार आहे. पुणे शहराच्या मंजूर विकास योजना आराखड्यामध्ये ८४ मीटर रूंदीचा विकास योजना रस्ता (कात्रज-कोंढवा) दर्शविलेला आहे. कात्रज कोंढवा रस्त्याचे ८४ ऐवजी आता ५० मीटर रुंदीकरण केले जाणार आहे. यामुळे भूसंपादनाचा खर्च २८० कोटी रुपये इतका येणार होता. त्यानुसार २०० कोटी रुपयांची मागणी राज्यसरकारकडे केली होती. मात्र राज्य सरकारने २०० कोटी ऐवजी १३९ कोटी रुपयांच्या निधी महापालिकेच्या खात्यात जमा केला आहे. हा रस्ता राजस सोसायटी ते खडी मशिन चौक ते महापालिका हद्दीतील पिसोळीपर्यंत आहे.

या रस्त्याच्या भूसंपादनासाठी पुणे महापालिकेच्या बजेटमध्ये ७४ कोटी रुपयांची तरतूद आहे. राज्य सरकारने रस्त्यासाठी १३९ कोटी रुपये निधी मंजूर केला आहे. त्यामुळे या रस्त्याच्या भूसंपादनासाठी २१३ कोटी रुपये निधी उपलब्ध आहे. या रस्त्यासाठी १ लाख ७५ हजार चौरस मीटर क्षेत्र ताब्यात घ्यायचे आहे. त्यापैकी ८ हजार २५० चौरस मीटर क्षेत्राचे भूसंपादन झाले आहे. सद्यस्थितीत ६२ हजार ७०० चौरस मीटर क्षेत्राचे भूसंपादन सुरू आहे. आता ९४ हजार चौरस मीटर क्षेत्राचे भूसंपादन करणे गरजेचे आहे. त्यासाठी ३७५ कोटींची आवश्यकता आहे. या रस्त्याच्या भूसंपादनामुळे कात्रज येथे ५९ मिळकती आणि कोंढवा येथे एकूण ७८ मिळकती बाधित होत आहेत. या रस्त्यासाठी भूसंपादनाची कार्यवाही सुरू करण्याचा प्रस्ताव पालिका आयुक्त डॉ.राजेंद्र भोसले यांनी ठेवला होता. या प्रस्तावाला स्थायी समितीने मंजुरी दिली आहे.